प्रेस प्रकाशनी **PRESS RELEASE**

**भारतीय रिज़र्व बैंक**
**RESERVE BANK OF INDIA**

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001
**Department of Communication**, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai - 400 001 फोन/Phone: 022 - 2266 0502

February 20, 2023

## भारतीय रिजर्व बँकेने युथ डेव्लपमेंट को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड., कोल्हापुर वर आर्थिक दंड ठोठावला

भारतीय रिजर्व बँकेने 14 फेब्रुवारी 2023 रोजीच्या आदेशाद्वारे युथ डेव्लपमेंट को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड.,कोल्हापुर (बँक) वर रिजर्व बँकेने वर नमूद केलेल्या बँकेवर लादलेल्या सर्व समावेशक निर्देशांचे पालन न केल्यामुळे/उल्लंघन केल्याबद्दल ₹1 लाख (केवळ एक लाख रुपये) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. बँकिंग नियमन कायदा, 1949 (BR कायदा) कलम 46(4)(i) आणि 56 सह लागू असलेल्या कलम 47A(1)(c) अन्वये भारतीय रिजर्व बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून हा दंड ठोठावण्यात आला आहे.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यामधे बँकेने तिच्या ग्राहकांसोबत केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही.

### पार्श्वभूमी

31 मार्च 2021 रोजीच्या आर्थिक स्थितीच्या संदर्भात आरबीआयने बँकेची केलेली वैधानिक तपासणी आणि जोखीम मूल्यांकन अहवाल, तपासणी अहवाल आणि त्याच्याशी संबंधित सर्व संबंधित पत्रव्यवहाराची तपासणी, यावरून असे निदर्शनास आले की, भारतीय रिजर्व बँकेने वर नमूद केलेल्या बँकेवर लादलेल्या सर्व समावेशक निर्देशांचे उल्लंघन करत भारतीय रिजर्व बँकेच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय कर्जदारांसह वन टाइम सेटलमेंट (OTS) योजना स्वीकारली. त्यानंतर, बँकेला नोटीस बजावण्यात आली होती ज्यात बँकेला त्यात नमूद केल्याप्रमाणे भारतीय रिजर्व बँकेच्या निर्देशांचे उल्लंघन केल्याबद्दल दंड का आकारण्यात येवू नये याची कारणे दाखवा अशी विचारणा करण्यात आली होती.

नोटिशीला बँकेचे उत्तर, बँकेचे अतिरिक्त सादरीकरण आणि वैयक्तिक सुनावणी दरम्यान केलेले तोंडी सादरीकरण यांचा विचार केल्यानंतर, भारतीय रिजर्व बँकेने निष्कर्ष काढला की वरील प्रमाणे भारतीय रिजर्व बैंकेच्या निर्देशांचे पालन न केल्याचा आरोप सिद्ध झाला आहे आणि अशा निर्देशांचे पालन न करण्याच्या मर्यादेपर्यंत आर्थिक दंड आकारला जाणे आवश्यक आहे.

**(Yogesh Dayal)**
Chief General Manager

**Press Release: 2022-2023/1756**